ARTHA (Commercial Weekly) Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख १० फेब्रुवारी, १९६० अंक ६

## विविध माहिती

**पाकिस्तान सरकारचीं कर्जें**—पाकिस्तानच्या सरकारनें मध्यवर्ती सरकारच्या मार्फत करण्यांत येणाऱ्या व राज्य सरकारामार्फत करण्यांत येणाऱ्या आर्थिक विकासाच्या कामासाठीं दोन नवीं कर्जें उभारण्याचें ठरविलें आहे. दोन्हीं कर्जांची मिळून रक्कम २२ कोटी रुपयांची आहे. ह्यापैकी किती कर्ज पूर्व बंगालसाठीं काढण्यांत येत आहे, तें समजलेलें नाहीं.

**मद्रास सरकारचीं नवीं वीज-केंद्रें**—मद्रास सरकारनें केरळ राज्याच्या सहकार्यानें वीज उत्पन्न करणारीं तीन नवीन केंद्रें उभारण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रांमधून २,९३,००० किलोवॅट वीज निर्माण करतां येईल. त्याशिवाय केंद्रासाठीं बांधण्यांत येणाऱ्या धरणाच्या पाण्यानें तामीलनाडमधील ४,१६,०७० एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल.

**बोट बांधण्याचा दुसरा कारखाना**—मध्यवर्ती अन्नमंत्री श्री. स. का. पाटील कालिकत येथें केरळमधील निवडणुकीच्या प्रचाराच्या सभेंत बोलत असतांना म्हणाले कीं, भारतामधील बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना कोचीन येथेंच काढण्यांत येणार आहे. ह्याबाबत निर्णय घेण्यांत आला असून तो बदलण्यांत येणार नाहीं.

**सुताच्या सहकारी गिरण्या**—मद्रास सरकारनें राज्यांत सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या सुताच्या तीन गिरण्या काढण्याचें ठरविलें आहे. ह्या गिरण्यांचे भाग-भांडवल घेण्यासाठीं म्हणून सरकारनें ३६ लाख रुपये मंजूर केले आहेत. गिरण्यांकडून हातमाग विणकरांच्या सहकारी संस्थांना दरमहा १,५०० गांसड्या सूत पुरविण्यांत येईल.

**आठवणी प्रसिद्ध करण्याचा हक्क**—ब्रिटनचे माजी मुख्य प्रधान मि. ईडन ह्यांच्या कारकीर्दींतील मध्यपूर्वविषयक राजकीय आठवणी लवकरच प्रसिद्ध करण्यांत येणार आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीसंबंधींचीं टिपणें अशा रीतीनें सामान्यतः प्रसिद्ध करण्यांत येत नाहींत. असें, असतांना मि. ईडन ह्यांना प्रसिद्धीची परवानगी कां देण्यांत आली ? असा प्रश्न पार्लमेंटांत उपस्थित करण्यांत आला आहे.

**मद्रास राज्यांत खताचे कारखाने**—मद्रास राज्यांत सुपरफॉस्फेट तयार करणारे आणखी तीन कारखाने काढण्यांत येणार आहेत. सध्यां आवडी येथें शॉ वालेस कंपनीचा एक कारखाना आहे. त्याचा विस्तार नुकताच करण्यांत आला. नवे सर्व कारखाने खाजगी मालकीचे राहणार आहेत. रासायनिक खतांची वाढती मागणी पुरविण्यासाठीं ते काढण्यांत येत आहेत.

**युरोपीय जवाहिऱ्यांची भेट**—पश्चिम जर्मनी आणि स्विट्झरलँडमधील जवाहिऱ्यांच्या प्रतिनिधिमंडळानें भारताला भेट दिली. जयपूर येथील जवाहिऱ्यांच्या व्यापाऱ्यांच्या त्यांनीं गांठी-भेटी घेतल्या. किंमती खड्यांना पैलू पाडणें, ते घासून लखलखीत करणें, इत्यादि बाबतींत जयपूरमधील जवाहिर-कामगारांची त्यांनीं प्रशंसा केली.

**प्राणिसंग्रहालयासाठीं रशिआंतील प्राणी**—भारतामधील प्राणिसंग्रहालयांत रशिआमधील कांहीं प्राणी ठेवण्याच्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. रशिआंतील पांढरीं अस्वलें जगप्रसिद्ध आहेत. पण त्यांना भारतामधील हवामान सोसवेल कीं नाहीं ह्याविषयीं शंका असल्यानें तीं आणलीं जाण्याची शक्यता मात्र फारशी नाहीं.

**मादक पदार्थांचा चोरटा व्यापार**—मलाया व आशिआंतील आणखी १० देशांनीं मादक पदार्थांची निर्मिति व त्यांचा चोरटा व्यापार ह्यांच्याविरुद्ध मोहीम काढण्याचें ठरविलें आहे. पाकिस्तानांत लाहोरमध्यें मादक पदार्थांचा खप व सेवन ह्यांच्यासंबंधीं एक परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेला गेलेल्या मलायाच्या प्रतिनिधीनें वरील वृत्त जाहीर केलें आहे.

**आस्वान धरणासाठीं कर्ज**—आस्वान धरणाचा दुसरा टप्पा पूर्ण करण्यासाठीं रशिआ संयुक्त-अरब प्रजासत्ताकाला १० कोटी इजिप्शिअन पौंडांचें कर्ज देणार आहे. पहिला टप्पा पूर्ण करण्यासाठीं रशिआनें ४० कोटी रुबलसचें कर्ज ह्यापूर्वींच मंजूर केलेलें आहे. हें धरण अरब व रशिअन एंजिनिअर्स मिळून बांधणार असून तें १९६७ मध्यें वेळापत्रकाच्या तीन वर्षें आधीं, पूर्ण होईल.

दातांच्या स्वच्छतेसाठीं
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**भरपूर खत-पाण्याची शेती**—अमेरिकेंतील फोर्ड फौंडेशनच्या मदतीनें भरपूर खतपाणी वापरून एकरीं अधिकांत अधिक पीक काढण्यासाठी सात शेतें संघटित करण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक शेत बिहारमधील शहाबाद तालुक्यांतील निवडण्यांत आलें आहे. ह्या शेतांत भाताच्या पिकासाठी प्रयोग करण्यांत येईल.

**वीज-पुरवठ्याची योजना**—ठाणें जिल्ह्यांतील विरार, आगाशी, अर्नाळा, सोपारा, इत्यादि गांवांना वीज पुरविण्याची एक योजना मुंबई सरकारनें तयार केली आहे. योजनेसाठी पांच लाख रु. खर्च येईल. ह्या भागांतील गांवांकडून विजेच्या पुरवठ्याची मागणी कित्येक दिवसांपासून करण्यांत येत होती.

**सागरांत बुडी घेण्याचा उच्चांक**—अमेरिकन नाविक दलांतील दोघा पाणबुड्यांनीं सागरांत खोल बुडी मारण्याचा उच्चांक निर्माण केला आहे. ह्या पाणबुड्यांनीं छोट्या पाणबुडी-सारख्या दिसणाऱ्या एका पोलादी कवचांत बसून पॅसिफिक महासागरांत ७ मैल खोली गांठली. समुद्राच्या तळाच्या संशोधनाच्या दृष्टीनें ह्या घटनेला महत्त्व देण्यांत येत आहे.


**तुतिकोरीन बंदराचा विकास**—भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील तुतिकोरीन बंदराचा विकास करण्याचें काम तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत हातीं घेण्यांत येईल. मंगलोरची निवड करावी कीं तुतिकोरीनची, असा प्रश्न उपस्थित झाला होता. पण, तुतिकोरीनचें बंदर गाळामुळें भरण्याचा संभव कमी असल्यामुळें त्याचीच निवड झाल्याचें समजतें.

**निर्वासित कुटुंबाची सोय**—दंडकारण्य भागांत निर्वासितांसाठी जी वसाहत उभारण्यांत येत आहे, तींत आतांपर्यंत १,२०० कुटुंबांची सोय करण्यांत आली आहे. आणखी एक महिन्यांत सुमारें २,००० कुटुंबाची नव्यानें सोय करण्यांत येईल. निर्वासितांच्या वसाहतींपैकी ही एक मोठी वसाहत आहे.

**सरकारी नोकरांची चौकशी**—नोव्हेंबर, १९५९ मध्यें मध्यवर्ती सरकारच्या १०१ नौकरांची लांचलुचपतीबाबत चौकशी चालू होती. त्यांना मध्यवर्ती गृहखात्याच्या खास पोलिसशाखेनें गैरवागणुकीबद्दल पकडलें होतें. १०१ नोकरांपैकी २७ गॅझेटेड ऑफिसर्स आहेत; ५ रेल्वेमधील आहेत; ४ लष्करांतील आहेत. भिलई कारखान्यांतील ४ वरिष्ठ नोकरहि पकडले आहेत.


शेतीच्या मशागतीस लोखंडी बळकट नांगरच वापरा

किर्लोस्कर नांगराने नांगरट खोल-वर होत असल्याने जमिनीतील तण न तणे निघून पुढील मशागत करणे सुलभ जाते. आपल्या जमिनीच्या मगदुराप्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.




किर्लोस्कर
स्थापना १८८८

सविस्तर माहितीसाठीं लिहा.
किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

STUSA KM4/59



५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८ ] गिरगांव, मुंबई ४. [ टेलिफोन : २७०९४

| | लाख | | लाख |
|---|---|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८·३० | ठेवी | रु. १०९·९४ |
| रिझर्व्ह | „ ९·०१ | खेळतें भांडवल | „ २३१·०० |
| कर्जे येणें | „ ६७·५३ | तरतें भांडवल | „ १६०·३८ |

तरत्या भांडवलाचें ठेवींशीं प्रमाण : ७६%

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, माहीम, वडाळा, पुणें व बेळगांव.



महिला शाखा : सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई – ४.

# अर्थ

बुधवार, ता. १० फेब्रुवारी, १९६०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## रस्त्यांवरील वाहतुकीचें वाढतें महत्त्व

इंडिअन रोड्स कॉंग्रेसचें रौप्यमहोत्सवाचें अधिवेशन बंगलोर येथें भरलें होतें. कॉंग्रेसनें भारतामधील रस्त्यांवरून होणाऱ्या वाहतुकीचा विकास करण्यासाठी २० वर्षे मुदतीची एक योजना सुचविली आहे. भारतांत पंचवार्षिक कार्यक्रमांच्या द्वारां आर्थिक प्रगति साधण्याचे प्रयत्न जोरानें करण्यांत येत आहेत. आर्थिक प्रगतीचा वेग जसजसा वाढत जाईल तसतसें कच्च्या मालाच्या व पक्क्या मालाच्या वाहतुकीचे अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होणें क्रमप्राप्तच आहेत; इतकेंच नव्हे, तर ते तांतडीनें सोडविले जाणेंहि आवश्यक आहे. इंडिअन रोड्स-कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. व्ही. आर. भट्ट ह्यांनीं ह्या बाबतींत दिलेले आंकडे चांगलेच उद्बोधक आहेत. भविष्यकाळांत वाहतुकीची गरज झपाट्यानें वाढत जाणार आहे. आणखी २० वर्षांनीं म्हणजे १९८० च्या सुमारास ८० कोटी टन वजनाचा माल दरसाल दूर अंतरावर वाहून न्यावा लागणार आहे. १९५० सालीं अवघा ९·३ कोटी टन माल वाहून नेण्यांत आला होता. देशांत निरनिराळ्या प्रकारचे अधिकाधिक रस्ते पद्धतशीर रीतीनें बांधण्याची गरज वरील आंकड्यांवरून कळून येईल. देशांतील औद्योगिक व शेतीचें उत्पादन वाढत चाललें असून फक्त रेल्वेच्या साह्यानें त्याची वाहतूक करणें अशक्य होत चाललें आहे. १९३४ सालीं इंडिअन रोड्स कॉंग्रेस या निमसरकारी संघटनेची भारत–सरकारनें स्थापना केली. भारतांत रेल्वे बांधण्याच्या कामाला जें एकांगी महत्त्व देण्यांत आलें होतें, तें कमी करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. शिवाय, रस्त्यांची बांधणी व जपणूक ह्या विषयांबाबत एंजिनिअर्स लोकांच्या कल्पनांची देवाणघेवाण करण्यासहि संघटनेचा उपयोग होत आला आहे.

कॉंग्रेसनें आंखलेल्या २० वर्षांच्या रस्ते-विकासाच्या कार्यक्रमांत ५,१०० कोटी रु. खर्च करण्याचें योजलें आहे. एवढा मोठा आकडा ऐकला कीं हा कार्यक्रम फार महत्त्वाकांक्षी व अव्यवहार्य आहे असें वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. रोड्स कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. भट्ट ह्यांनीं तर कार्यक्रमाला 'छोटा कार्यक्रम' असेंच नांव दिलें आहे; आणि प्रत्यक्ष गरजांचा विचार करतां तो तसा भासल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. शिवाय रस्ते, त्यावर झालेल्या खर्चाच्या मानानें चांगलें उत्पन्न देत असून स्वयंपूर्ण झाले आहेत अगर होत आहेत ही गोष्ट लक्षांत घेतां, रस्त्यांच्या विकासावरील खर्च भरमसाठ वाटणार नाहीं. मोटारींवर जो जबर कर घेण्यांत येतो त्यामुळें उत्पन्नांत वाढच होत चालली आहे. श्री. भट्ट ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं, येत्या वर्षी मोटारीवरील कराच्या रूपानें सुमारें १२० कोटी रु. गोळा होतील आणि रस्ते चांगल्या स्थितींत राखण्यासाठीं अवघे ९० कोटी रु. खर्च होतील. कॉंग्रेसनें आंखलेल्या रस्ते-विकासाच्या कार्यक्रमावर मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. तथापि, सर्वसामान्यपणें तो मान्य होईल असें भारताचे वाहतुकमंत्री श्री. राजबहादूर ह्यांनीं आपल्या भाषणांत सूचित केलें आहे. त्याचप्रमाणें मध्यवर्ती सरकारनें राज्य सरकारांना अशा सूचना पाठविल्या आहेत कीं, त्यांनीं आपल्या हद्दींतील रस्ते कॉंग्रेसनें आंखलेल्या कार्यक्रमाशीं जुळतें राहतील अशी खबरदारी घ्यावी. लांबवर जाणारे मोठे रस्ते ज्याप्रमाणें जरूर आहेत त्याचप्रमाणें खेड्यांना जवळपासच्या बाजारपेठांशीं जोडणारे कमी लांबीचे रस्तेहि महत्त्वाचे आहेत. रोड्स कॉंग्रेसनें आंखलेल्या रस्त्यांच्या कार्यक्रमांत अशा प्रकारच्या बांधणीसाठीहि मोठ्या रकमेची शिफारस केली आहे.

## आर्थिक प्रगति व लोकसंख्येची वाढ

मुंबई येथें भारतीय विद्याभवनांत बोलतांना मद्रास येथील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ पाप्युलेशन स्टडीज ह्या संस्थेचे चालक डॉ. एस्. चंद्रशेखर ह्यांनीं, झपाट्यानें वाढणाऱ्या भारताच्या लोकसंख्येबद्दल पुनः एकदा इषारा दिला आहे. डॉ. चंद्रशेखर आपल्या भाषणांत म्हणाले कीं भारताला स्वातंत्र्य मिळून १२ वर्षांवर काळ आतां लोटला आहे. पण इतक्या अवधींत लोकांच्या मूलभूत गरजा सुद्धां योग्य रीतीनें पुरविण्यांत यश आलेलें नाहीं. अन्न, वस्त्र, आसरा, शिक्षण आणि आरोग्याच्या सोयी ह्या सर्व लोकांच्या मूलभूत गरजा आहेत आणि लोकसंख्येच्या वाढीचा सध्यांचा वेग असाच चालू राहील तर ह्या गरजा कधींकाळीं तरी पुरवितां येतील कीं नाहीं ह्याविषयीं शंकाच वाटते. म्हणजे आज तरी चित्र बरेंच निराशाजनक आहे. मार्क्सवादी व रोमन कॅथॉलिक धर्मपंथाचे लोक कुटुंबनियोजनाच्या विरुद्ध आहेत. मार्क्सवाद्यांचें म्हणणें असें आहे कीं, सध्यांची समाजरचना बदलून नवी समाजरचना उभारली तर सर्व लोकांना पुरेसें खावयास मिळेल; इतकेंच नव्हे तर गरजेपेक्षाहि अधिक धान्य पिकूं शकेल. कॅथॉलिकांचें म्हणणें असें कीं निसर्ग हा उदार आहे. म्हणून कुटुंबनियोजनाची गरज नाहीं. भारतामधील कुटुंबनियोजन हें लोकांच्या इच्छेवर आधारलेलें आहे. त्याबाबत कोणावरहि सक्ति नाहीं. तथापि भारतामधील शेतीचें उत्पादन किती वाढूं शकेल ह्यालाहि कांहीं मर्यादा आहे. म्हणून शेतीच्या उत्पादनवाढीच्या योजनांबरोबरच लोकसंख्येच्या वाढीवर नियंत्रण घालण्याचे प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत. नव्यानें अस्तित्वांत येत असलेल्या औद्योगिक शहरांतून कुटुंबनियोजनाचा प्रचार विशेष जोरानें करण्यांत आला पाहिजे.

**केरळमधील निवडणुकीचा निकाल**—केरळमध्यें नुकत्याच झालेल्या निवडणुकींत कम्युनिस्ट पक्षाचा पराभव झाला आहे. ह्या घटनेचें अमेरिकन लोकांनीं स्वागत केलें आहे. कम्युनिस्टांच्या आश्वासनांनीं हिंदी लोक फसत नाहींत असा निष्कर्ष कांहीं अमेरिकनांनीं काढला, तर इतरांच्या मतानें अमेरिकेचें खाजगी भांडवल भारतांत गुंतविणें धोक्याचें नाहीं हें निवडणुकीच्या निकालावरून दिसून आलें.

## सहकारी लिक्विडेटर्सचा मार्गदर्शक

" सहकारी खात्याचा व्याप स्वातंत्र्य मिळाल्यापासून सारखा वाढत आहे. नवीन सोसायट्यांच्या निर्मितीबरोबर अनेक सोसायट्यांचा कारभारहि गुंडाळला जात आहे. सोसायटीचा कारभार कसा गुंडाळावा व लिक्विडेटर म्हणून काम कसें करावें याबद्दल संकलित अशी माहिती मराठींत सध्यां तरी उपलब्ध नाहीं. सहकारी खात्यानें १९१९ सालीं १९१२ च्या कायद्याला धरून 'के' परिपत्रक लिक्विडेटरसाठी प्रसिद्ध केलें होतें. परंतु आज तेंहि दुर्मिळ आहे. सध्यां लिक्विडेटरचें काम करणारे बरेचसे सुपरवायझर्स आहेत व तेहि नवीन असल्यामुळें नोटीस कशी काढावी, लिलाव–प्रकरण कसें तयार करावें, वगैरे प्रत्यक्ष काम करतांना त्यांना अडचण भासते. त्यामुळें पुष्कळ वेळां वेळ असूनहि केवळ माहिती नसल्यामुळें त्यांच्याकडून लिक्विडेशनच्या कामाचा व्हावा तसा उरक होत नाहीं. ही अडचण लक्षांत घेऊन नवीन लोकांना मार्गदर्शन करण्याच्या इरादानें हें छोटें पुस्तक लिहिलें आहे. सदर पुस्तकांत लिक्विडेटरनें काम कसें करावें याबद्दल सोप्या भाषेंत माहिती दिली असून प्रत्यक्ष प्रकरणें तयार करून दाखविलीं आहेत. त्याचप्रमाणें लिक्विडेटरला उपयोगीं पडणारीं कायद्याचीं कलमें व कानू हेंहि शेवटीं दिले आहेत. त्यामुळें नवीनच काम करणाऱ्या लिक्विडेटर्सना या पुस्तकाचा अतिशय उपयोग होईल. आपल्या ज्ञानांत भर पडावी या दृष्टीनें प्रत्येक सोसायटीनें हें पुस्तक आपल्या दप्तरीं ठेवण्यास हरकत नाहीं." पुस्तकाचे लेखक, श्री. बी. एन. पाटील, बी. ए. (ऑनर्स), जी. डी. सी. ए., असिस्टंट डिस्ट्रिक्ट को. ऑफिसर आणि श्री. के. बी. देशपांडे, एस. टी. सी, को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक, ह्यांनीं आपल्या निवेदनांत वरीलप्रमाणें पुस्तकाचा उद्देश स्पष्ट केला आहे. नाशिक विभागाचे डेप्युटि रजिस्ट्रार, श्री. म. बा. घोरपडे, बी. ए., एलएल. बी. ह्यांचा पुस्तकास पुरस्कार आहे. त्यांत ते लिहितात,

" स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकारी चळवळीचीं फार मोठ्या प्रमाणांत वाढ झाली आहे. सन १९४७ मध्यें मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांची संख्या सोळा हजारांच्या आसपास होती, व त्यांचें एकूण खेळतें भांडवल सुमारें शंभर कोटींचें होतें. आज सहकारी संस्थांची संख्या ३१ हजारांच्या वर गेली असून त्यांचें एकूण खेळतें भांडवल सुमारें २५० कोटींच्या जवळपास आहे. यावरून गेल्या दशकांत सहकारी चळवळीचा दुपटीपेक्षा जास्त विकास झाला आहे हें दिसून येतें.

" कुठल्याहि प्रयत्नाची एक दुसरी बाजू असतें, ती म्हणजे प्रयत्न करीत असतां झालेल्या चुकांची व त्यामुळें पत्करावा लागलेल्या पराभवाची होय. सन १९४८ मध्यें रद्द झालेल्या सहकारी संस्थांची संख्या दोन हजाराच्या आसपास होती ती आज तीन हजारावर गेली असून त्यांत गुंतलेलें एकूण भांडवल दहा कोटीच्या जवळपास आहे. रद्द झालेल्या संस्थांचें काम यापूर्वी रेंगाळत चाललें होतें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. सहकारी चळवळीस येत चाललेलें वाढतें महत्त्व लक्षांत घेतां रद्द झालेल्या संस्थांचें काम शक्यतों त्वरित गतीनें पूर्ण करण्याकडे कल वाढूं लागला आहे. परंतु हें काम कसें पूर्ण करावें यासंबंधीं आजवर एकाहि पुस्तक लिहिलें गेलें नाहीं. हें कार्य वास्तवतः जेवढें महत्त्वाचें वाटावयास पाहिजे आहे तेवढें तें नाहीं अशी जी सामान्यपणें एक चुकीची समजूत प्रचलित आहे, ती कदाचित् या उणीवेस कारणीभूत झाली असेल. तें कांहीं असो श्री. कृ. भा. देशपांडे व श्री. बा. ना. पाटील यांनीं लिक्विडेटर्सना मार्गदर्शन करणारें पुस्तक लिहून ही उणीव भरून काढली आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं.

" या पुस्तकांत केलेली विषयाची मांडणी व्यवस्थित व शुद्ध असून भाषा सोपी वापरली आहे. जरूर तेथें कायद्याचें व कानूचें कलम उद्धृत केल्यामुळें अगदीं नवीन लिक्विडेटर्सचें काम करणाऱ्यांनासुद्धां कोणतीच अडचण भासत नाहीं; त्यामुळें या पुस्तकाची उपयुक्तता वाढली आहे. शेवटीं शेवटीं तर जरूर लागणाऱ्या कायद्याच्या कलमांचा व कानूंचा अनुवाद दिल्यामुळें कार्य करणाऱ्याचें कोठेंच नडत नाहीं.

"दैनंदिन कामकाजामध्यें कुठेंच नडतां कामा नये हा दृष्टिकोन नजरेसमोर ठेवून प्रकरणें कशी तयार करावींत हें पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्टें या सदरांत प्रत्यक्ष दाखविलें आहे. प्रकरणाचे नमुने व भरपूर उदाहरणें दिलीं गेलीं असल्यामुळें हें पुस्तक सरकारी व बिनसरकारी लिक्विडेटर्सचें काम करणाऱ्यांना खऱ्या अर्थानें मार्गदर्शक झालें आहे. सर्व लिक्विडेटर्स या पुस्तकांचा भरपूर उपयोग करून घेतील अशी माझी अपेक्षा आहे.'

पृ. सं. ६६ किं. १ रु.

---

## ऑस्ट्रेलिआ गोऱ्या लोकांचाच राहील काय ?

गेल्या कांहीं वर्षांत ऑस्ट्रेलिआ आणि आशिआंतील इतर देश ह्यांचे संबंध अधिक जवळ येऊं लागलेले आहेत. तरीसुद्धां आशिआंतील लोकांना ऑस्ट्रेलिआंत मोकळेपणानें येऊं दिलें तर ऑस्ट्रेलिआंतील गोऱ्या लोकांचें स्थान कमी होईल अशी भीति तेथें वाटत आहे. ही भीति ऑस्ट्रेलिआच्या लोकांत पुष्कळ वर्षांपासून रूढ झालेली आहे. ऑस्ट्रेलिआ हा देश फक्त गोऱ्या लोकांचें राखीव कुरण राखावयाचें असें धोरण अधिकृतपणें स्वीकारण्यांत आलेलें नाहीं. तरी पण अगदीं थोड्या आणि काळजीपूर्वक निवडण्यांत आलेल्या आशियाई लोकांनाच ऑस्ट्रेलिआंत कायमचे स्थानिक होऊं देण्यांत येतें. मात्र ऑस्ट्रेलिआंतील लोकमत ह्या बाबतींत अधिक उदार होऊं लागलें आहे, असें लोकमताची चांचणी घेतांना आढळून आलें आहे. आशिआई लोकांना ऑस्ट्रेलिआंत वसाहती करून देण्यास हरकत नाहीं असें मत चांचणी घेतलेल्या लोकांपैकी ५५ टक्के लोकांचें आढळून आलें. फक्त ३४ टक्के लोकांनीं आशिआई लोकांच्या अनिर्बंध वसाहतींना विरोध केला. ११ टक्के लोकांनीं कांहींच मत प्रदर्शित केलें नाहीं. ज्या लोकांनीं आशिआई लोकांना ऑस्ट्रेलिआंत कायमचा प्रवेश देण्यास अनुकूल मत दिलें, त्यांनीं सुद्धां ही संख्या दरसाल ५०० पेक्षा अधिक असू नये असें सुचविलें आहे. लोकमतांत झालेला हा फरक फार महत्त्वाचा आहे. पण केवळ लाक्षणिक फरकापेक्षा तो अधिक अर्थपूर्ण आहे. आशिआंतील देशांशीं वागतांना ऑस्ट्रेलिआनें चांगला शेजारी म्हणून वागलें पाहिजे ही भावना आतां वाढीस लागली आहे, इतकेंच ह्यावरून समजतां येईल.

---

**उद्योगपतींना सवलत**—पाकिस्तानच्या सरकारनें आपल्या उद्योगपतींना परदेशीय चलनाबाबत सवलत देण्याचें ठरविलें आहे. जे उद्योगपती नवे उद्योगधंदे काढण्यासाठी परदेशीय तज्ज्ञांचा सल्ला घेण्यास परदेशाला जातील त्यांना जरूर तितकी हुंडणावळ सरकार देणार आहे. औद्योगीकरणाच्या बाबतींतील एक महत्त्वाचा अडथळा दूर करण्याचा हा एक मार्ग आहे.

## मुंबई राज्यांतील हातमाग धंदा

पुनर्रचित मुंबई राज्यांत सर्व प्रकारचे मिळून एकूण २,४२००० हातमाग असावेत असा अंदाज आहे. यांपैकी १९५८-५९ च्या अखेरीपर्यंत १,९२,००० हातमागांची नोंद झालेली होती.

हातमागविषयक संशोधन आणि शिक्षणयोजनेनुसार नमुने तयार करण्याचीं पांच केंद्रें सुरू करण्यांत आलीं आहेत. हीं सर्व केंद्रें सहकारी संस्था चालवितात व त्यासाठीं भारत सरकार त्यांना आर्थिक मदत व कर्ज देऊन साह्य करतें. मुंबई येथील नमुनेदार उत्पादनकेंद्र चालविण्यासाठीं राज्य औद्योगिक सहकारी संघटनेला साह्य देण्यांत आलें आहे. हातमागविषयक संशोधन करण्यासाठी व सुतावर प्रक्रिया करण्यासाठीं राजकोट येथें एक संशोधन आणि उत्पादन केंद्र आणि नागपूर येथें एक डाइंग अँड ब्लीचिंग केंद्र सुरू करण्यांत आलें असून, भारत सरकारच्या साह्यानें सौराष्ट्रांत पांच शिक्षणकेंद्रें चालू करण्यांत आलीं आहेत.

### तांत्रिक सुधारणा

हरेक प्रकारचें आकर्षक हातमागी कापड तयार करण्यासाठीं सुधारलेल्या तंत्रांचा आणि साधनसामग्रीचा कोष्टयांना वापर करता यावा म्हणून ती विकत घेण्यासाठीं कोष्टयांच्या सहकारी संस्थांना आर्थिक साह्य देण्यांत आलें. ह्या नवीन प्रकारच्या तंत्रांचा व साधनांचा अवलंब केल्यामुळें त्यांच्या दृष्टिकोनांत फरक पडला व ग्राहकांच्या आवडीप्रमाणें हरेक प्रकारचें आकर्षक कापड ते विणूं लागले. ९७ विणकर सहकारी सोसायट्यांसाठीं रंगकेंद्रें स्थापन करण्यास मान्यता देण्यांत आली. ह्या नवीन तंत्रांचा व साधनांचा उपयोग करून कोष्टी जें कापड बनवितात तें अधिक आकर्षक व मुलायम व्हावें म्हणून कॅलेण्डरिंग, ब्लीचिंग आणि फिनिशिंग विभाग सुरू करण्यासाठी बडोदें, मालेगांव व सोलापूर येथील विणकरांच्या सहकारी सोसायट्यांना आर्थिक साह्य आणि कर्जाऊ रकमा देण्यांत आल्या आहेत.

मुंबई राज्यांत आज ७६८ विणकर सहकारी सोसायट्या आहेत. यांपैकी ५१२ सोसायट्यांनीं उत्पादनकार्यास प्रारंभ केला आहे. सहकारी सोसायट्यांना उत्तेजन देण्यासाठीं दरवर्षी हातमाग सप्ताहांत, चांगल्या व्यवस्थेसाठीं प्रत्येक जिल्ह्याला बक्षिसें ठेवण्यांत येतात. त्याखेरीज अतिशय चांगला कारभार चालविणाऱ्या सहकारी सोसायटीसाठीं जिल्हानिहाय फिरतें करंडक असतात, ते निराळेच.

### आर्थिक साह्य

सहकारी संस्थांच्या भाग भांडवलासाठीं, सोसायटीचे शेअर खरेदी करतां यावेत म्हणून विणकरांच्या भाग भांडवल कर्जासाठीं, तसेंच, खेळत्या भांडवलासाठीं व बाजारपेठविषयक व्यवस्थेसाठीं सहकारी संस्थांना आर्थिक साह्य मिळतें.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें मध्यवर्ती सहकारी बँकांना १९५७-५८ आणि १९५८-५९ मध्यें अनुक्रमें १७,१६,००० आणि २०,५५,००० रु. कर्ज मंजूर केलें व सेंट्रल फिनान्सिंग विणकरांच्या सहकारी संस्थांना अनुक्रमें ५,१८,००० रु. व ९,९५,७०० रु. कर्जाऊ दिले.

शुद्ध रेशमी वस्त्रें विणणाऱ्या हातमागांना भाग भांडवलासाठीं व खेळत्या भांडवलासाठीं कर्ज देण्यांत येतें. भाग भांडवलाच्या ८७½ टक्के व प्रत्येक हातमागासाठीं ५०० रुपये याप्रमाणें हे कर्ज मिळतें. भाग भांडवल व खेळत्या भांडवलासाठीं एकूण अनुक्रमें २०,७०० रुपये व ३८,५०० रुपये देण्यांत आले.

### हातमागी मालाच्या विक्रीची व्यवस्था

छोट्या उद्योगधंद्यांतील मालाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठीं सरकार नेहमींच विविध प्रयत्न करीत असते. हातमाग धंद्याचा विचार केला तर सेस फंड, हातमागी कापडाच्या विक्रीवर सूट, इत्यादि उपाययोजना करण्यांत आल्या आहेत. सध्यां किरकोळ विक्रीवर दर रुपयामागें ६ नये पैसे व घाऊक विक्रीवर ३ नये पैसे या प्रमाणें ही सूट मिळते. दुसरी योजना सुरू झाल्यापासून ३१ मार्च, १९५९ पर्यंत ही सूट देण्यासाठीं एकूण १,२३,७३,००० रुपये देण्यांत आले.

फिरत्या गाड्यांतून हातमागी कापडाची विक्री करण्याचीही एक योजना असून, बाजाराच्या दिवशीं, जत्रा भरतात त्यावेळीं आणि अशाच प्रसंगीं ह्या फिरत्या गाड्या खेड्यांत जातात व तेथील खेडुतांना पाहिजे तो माल पुरविला जातो. शहरांतील लोकांसाठीं शहरांत भांडारें उघडण्यासाठीं भारत सरकार आर्थिक साह्य देतें. सेस फंड योजना सुरू झाल्यापासून सरकारच्या आर्थिक साह्यानें १६३ विक्रीकेन्द्रें उघडण्यांत आलीं आहेत.

हातमागी मालाला प्रसिद्धि आणि बाजारपेठ मिळवून देण्यासाठीं, आंखलेल्या योजनांत प्रमुख ठिकाणीं प्रदर्शनें उघडणें, हातमागी मालाला प्रसिद्धि देणें, इत्यादींचा अंतर्भाव होतो.

### सुताच्या गिरण्या

चांगल्या दर्जाचें सूत योग्य त्या भावानें कोष्टयांना सुलभपणें उपलब्ध होत नाहीं आणि परिणामीं त्यांना हलक्या दर्जाच्या सुतासाठीं पुष्कळच अधिक भाव देऊन तें विकत घ्यावें लागतें. ही अडचण लक्षांत घेऊन, सूत गिरण्यांच्या भाग भांडवलासाठीं आर्थिक साह्य देण्याचें भारत सरकारनें जाहीर केलें असून सौराष्ट्रांत या योजनेखालीं एक गिरणी सुरूहि झाली आहे. तसेंच, साध्या हातमागाचें स्वयंचलित किंवा विजेवर चालणाऱ्या मागांमध्यें रूपांतर करण्यासाठीं ८८,९०,७५९ रुपयांपर्यंत कर्ज रूपानें व ५,५९,५०० रुपये आर्थिक साह्य म्हणून देण्यांत आलें. त्याचप्रमाणें, प्रात्यक्षिक आणि शिक्षणकेन्द्रें सुरू करण्यासाठी १,०१,०११ रुपये कर्जाऊ रकम व ६९,१३६ रुपये आर्थिक साह्य मंजूर करण्यांत आलें आहे.

कांहीं विशिष्ट जागीं व विजेची सोय असलेल्या ठिकाणच्या विणकरांच्या सहकारी सोसायट्यांना १५ यंत्रमाग द्यावेत असें ठरलें आहे. १९५७-५८ मध्यें सात सहकारी सोसायट्यांसाठीं ११४ व १९५८-५९ मध्यें २३ सहकारी सोसायट्यांसाठीं ४९८ यंत्रमागांना मान्यता देण्यांत आली आहे. १९५७-५८ व १९५८-५९ मध्यें निरनिराळ्या सहकारी सोसायट्यांसाठीं मान्यता देण्यांत आलेल्या ४८८ यंत्रमागांपैकीं १९५८-५९ च्या अखेरीपर्यंत २६६ यंत्रमाग बसविण्यांत आले. १९५९-६० च्या अखेरीस ३५ सहकारी सोसायट्यांत मिळून एकूण ५८० यंत्रमाग बसविण्याचा इरादा आहे.

### सुखसोई

कोष्टयांना अधिक चांगल्या प्रकारें जगतां यावें, त्यांना राहण्यासाठीं चांगलीं घरें मिळावींत, म्हणून सरकारनें योजना आंखलेल्या आहेत. योजनांमधील घरबांधणी योजनेखालीं सोलापूर व मैंदरगी येथें प्रत्येकी एक वसाहत उभारण्यांत आली असून १९५९-६० मध्यें नागपूर, चांदा आणि कामटी या ठिकाणीं एकूण सुमारें ४६० घरें असलेल्या वसाहती उभारण्याचा इरादा आहे.

अमेरिका, सिलोन, पूर्व आफ्रिका, मध्यपूर्वेतील देश, इत्यादि देशांकडे या राज्यांतील हातमागांचीं वस्त्रें निर्यात होतात.

## प्रसिद्धीचें तंत्र

### मोठमोठ्या कारखानदारांनाच नव्हे, तर प्रत्येक लहानमोठ्या धंदेवाईकांना धंद्याच्या वाढीसाठी आवश्यक असलेलें एक आधुनिक साधन

[ लेखक :—जयदेव कपूर, वर्क्स डायरेक्टर, अटलास सायकल इंडस्ट्रीज, सोनपत. ]

प्रसिद्धीची जरूरी कितपत आणि तिचा उपयोग किती होतो, याविषयीं वेगवेगळाली मतें असूं शकतील. परंतु सध्यां जाहिरातींचें युग आहे हें मात्र मान्यच करायला हवें. कोणास कांहींहि करायचें असेल तरी प्रसिद्धीशिवाय भागतच नाहीं. फक्त व्यापार-धंद्यांसाठींच जाहिरातींचा उपयोग असतो, अशी एक गैरसमजूत फार पूर्वीपासून पसरलेली आहे. खप वाढविण्यासाठी धंदेवाईक मंडळी आणि कारखानदार आपल्या मालाचें फाजील गुणवर्णन करतात असा आरोप करण्यांत येतो. पूर्वीची गोष्ट कांहींहि असो, पण सध्यां मात्र वस्तुस्थिति अगदीं निराळी आहे. बारकाईनें पाहिल्यास एक गोष्ट लगेच ध्यानांत येईल. ती ही कीं, जाहिरातीच्या क्षेत्रांत फक्त कांहीं मूठभर व्यापाऱ्यांची किंवा कारखानदारांची मक्तेदारी आतां राहिलेली नाहीं. जवळ जवळ सर्वच गोष्टींची जाहिरात सध्यां चालू असते. सरकारचा हेतु नफा कमविण्याचा नसतो; तरीहि सरकार प्रचंड प्रमाणांत प्रसिद्धीचा खटाटोप करतें. किंबहुना प्रत्येक सरकारी मंत्रालय, तसेंच प्रत्येक सरकारी खातें यांचा स्वतःचा प्रसिद्धिविभाग असतो. त्याला 'जनतासंपर्क' विभाग म्हणतात एवढाच काय तो फरक. प्रसिद्धीचीं जेवढीं साधनें धंद्याच्या आणि कारखानदारीच्या क्षेत्रांत वापरलीं जातात तीं सर्व आणि त्यासेरीज इतरहि साधनें सरकार वापरतें. सरकारी चित्रपटांत कोणती बाब हाताळायची म्हणून शिल्लक राहिली आहे ? पंचवार्षिक योजना असो वा वनमहोत्सव असो, त्यांच्यावर काढलेला सरकारी चित्रपट असायचाच ! अर्थातच सरकार स्वतःच्या प्रसिद्धीला 'माहिती' चा पेहेराव चढवतें. परंतु नांव कोणतेंहि दिलें तरी त्यामागें प्रसिद्धीशिवाय दुसरें कांहींच नसतें.

प्रसिद्धीचा मार्ग पहिल्या प्रथम कोणी अवलंबिला असेल तर तो व्यापारी आणि कारखानदारी संघटनांनींच होय, याबद्दल मुळींच शंका नाहीं. खरी गोष्ट अशी कीं, जाहिरातींचा पाया याच मंडळींनीं घातला व जाहिरात धंद्याची सध्यांची प्रगत अवस्था हि सुद्धां त्यांच्याच मेहनतीचें फळ आहे.

अगदीं प्रथम, गिऱ्हाईक जिंकण्यासाठी दारोदार तोंडी जाहिरातीचा वापर कोणीतरी विक्रेत्यानें केला असावा. आजहि जाहिरातीच्या या प्रकाराकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं; उलट, जाहिरातींच्या अनेक प्रकारांत त्याचें महत्त्व आजहि टिकून आहे. एखाद्या विक्रेत्याचें उदाहरण आठवा म्हणजे हा मुद्दा सहज पटेल. समजा, तो एखादा जिन्नस उदा. स्टोव्ह विकत आहे. गिऱ्हाईक भेटल्यावर तो प्रथम आपल्या स्टोव्हचा ब्रँण्ड व नांव सांगेल. नंतर त्याचा स्टोव्ह हा इतर स्टोव्हपेक्षा अधिक उत्तम आहे हें गिऱ्हाइकाच्या मनांत बिंबविण्याचा प्रयत्न तो करील. स्टोव्हचा प्रत्येक भाग तो खोलून दाखवील व एखाद्या सर्जननें मेडिकलच्या विद्यार्थ्यांना शरीरशास्त्र शिकवावें त्याप्रमाणें प्रत्येक भागाचें कार्य व उपयुक्तता तो समजावून देईल. हें करीत असतां वापरायला सोपें जावें अशा दृष्टीनें स्टोव्हची घडण केलेली आहे या मुद्द्यावर तो भर देईल. नंतर तो स्टोव्ह पुन्हां जोडून पेटवील व त्याची सुंदर निळी ज्योत दाखवील; एवढेंच काय, त्यावर चहा किंवा कॉफी किती लवकर होते हें दाखविण्यासाठी तो एक वेळ कपभर चहाहि करून देईल व स्टोव्हवर केलेल्या चहाकॉफीला वेगळीच लज्जत येते असेंहि सुचवील !

ही सर्व धडपड तो विक्रेता त्याच्या जिनसेला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष प्रसिद्धि मिळावी म्हणूनच करीत असतो. यासाठीच माल तयार करणारे कारखानदार माल खपविण्यासाठी चांगल्या कीर्तीच्या दुकानांची निवड करतात. कारण, अशा दुकानांच्यापाशीं पुरेसे हुषार विक्रेते असतात.

व्यापारी व कारखानदारी जाहिरातींचें दुसरें नेहमींचें साधन म्हणजे वृत्तपत्रें. आपल्या देशांत साक्षरांचें प्रमाण फार थोडें आहे. तरीसुद्धां वृत्तपत्रें हें उत्तम व महत्त्वाचें साधन आहे. वाढत्या साक्षरतेबरोबर असल्या जाहिरातींचें महत्त्व उत्तरोत्तर वाढतच जाईल. सध्या इंग्लिश वृत्तपत्रांचा खप प्रचंड आहे. पण प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रेंसुद्धां पुढें सरसावत आहेत. साहजिकच प्रसिद्धि धंद्याचा वाढता वांटा त्यांच्याकडे जाईल. या माध्यमाचा प्रथमपासूनच उपयोग अनेक उद्योगधंद्यांनीं केलेला दिसेल. उदाहरणार्थ, सायकलीच्या धंद्याला अशा वृत्तपत्रीय जाहिरातींचा उपयोगहि चांगला होतो असा अनुभव आहे. केवळ वृत्तपत्रेंच नव्हेत तर खास त्या धंद्यासाठींच निघालेलीं नियतकालिकें हीं देखील प्रसिद्धीसाठी उपयोगीं पडतात. असें एखादें मासिक नुसतें चाळलें तरी तें जाहिरातींनीं गच्च भरलेलें दिसेल. लहानमोठे कारखानदार सर्वजण या मासिकांचा उपयोग करतात. अर्थातच त्याचा त्यांना बराच फायदा होत असावा.

हमरस्त्यांवरील मोठ्या पाट्या हा सुद्धां एक महत्त्वाचा जाहिरातींचा प्रकार आहे. याकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. निरक्षर गिऱ्हाइकाच्या मनांत प्रवेश मिळविण्यासाठी यासारखें दुसरें साधन नाहीं. मात्र अशी मोठी पाटी महत्त्वाच्या चौकांत असावी. उदाहरणार्थ, भलेंमोठें चित्र-सायकल व त्यावरोबर उत्साही सायकलस्वार म्हणा-किंवा दुसऱ्या एखाद्या वस्तूचें असेंच मोठें चित्र म्हणा-हमखास लक्ष वेधून घेतेंच.

चित्रपट आणि प्रदर्शनें हा सुद्धां प्रसिद्धीचा प्रभावी मार्ग आहे. कारण येथें केवळ वस्तूचीच जाहिरात नसते, तर तिचा वापर जेथें होतो तेथील वातावरणहि हुबेहूब निर्माण करण्यांत येतें. युरोप व इंग्लंड येथें व्यापारी प्रदर्शनें व 'जत्रा' नेहमीं भरतात व व्यापार वाढविण्यास त्यांची फारच मदत होते. भारतांतहि अशा प्रदर्शनांचें वाढतें महत्त्व सायकलींच्या धंद्यास कळलें आहे. "भारत १९५८" या प्रदर्शनांतील पहिलें व दुसरें बक्षीस सायकलींच्या धंद्याना मिळालें, यावरून ही गोष्ट उघड होईल.

---

तिरुपतीला रुंद रुळाची रेल्वे—दक्षिण भारतामधील प्रसिद्ध देवस्थान तिरुपति येथें जाण्यासाठी सध्यां अरुंद रुळाची रेल्वे आहे. तिरुपतीला जाण्याचा रेल्वेमार्ग रुंद रुळाचा करण्याचा विचार रेल्वे बोर्ड करीत आहे. तिरुपतीला जाणाऱ्या यात्रेकरूंची संख्या कित्येक लाख असल्यामुळें सध्यांचा रेल्वेमार्ग अपुरा पडत आहे.

### चिंचवड गाडीवडार मजूर को. सोसायटीच्या ऑफिस-कचेरीचें उद्घाटन

चिंचवड गाडीवडार मजूर को ऑपरेटिव्ह सोसायटीचें ऑफिस-इमारतीचें उद्घाटन चिंचवड स्टेशननजिक दिनांक १।२।१९६० रोजीं पुणें सेंट्रल को. बँकेवर मुंबई राज्य सरकारनें नेमलेले डायरेक्टर श्री. रणछोड पांडुरंग भोंडे यांच्या हस्तें झालें. श्री. भोंडे यांनीं आपल्या भाषणांत सोसायटीनें केलेल्या प्रगतीबद्दल धन्यवाद दिले व स्वतःची इमारत बांधल्याबद्दल तिची प्रशंसा केली. सोसायटीस त्याचे व्यवसायाचे कामीं दैनंदिन व्यवहारांत येत असलेल्या अडचणी वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढें मांडण्याचें आश्वासन दिलें. सदरची सोसायटी १९५५ सालीं स्थापन झाली व तिचे सभासद १२५ आहेत. सोसायटीनें मालट्रक विकत घेतला असून आतांपर्यंत सोसायटीनें हवेली तालुक्यांत सीड गोडाऊन व ग्रामसेवक क्वार्टर्स अशीं सहा बांधकामें केलीं आहेत. सोसायटीचे चेअरमन श्री. अण्णा त्रिंबक माने व सेक्रेटरी श्री. जगन्नाथ बाबूराव दौंडकर आहेत.

### मुंबईत धान्य-गुदामें

मुंबईतील धान्यगुदामांच्या बांधकामास मध्यवर्ती बांधकामखात्याकडून लवकरच प्रारंभ होणार आहे. या गुदामांसाठी बोरिवली येथें १०७ एकरांची जागा घेण्यांत आली आहे. सदर गुदामांत १,२५,००० टन अन्नधान्य सांठवितां येईल. पहिल्याप्रथम ५०,००० टन धान्यसांठवणीचीं जागा असलेलीं गुदामें बांधण्यांत येतील. त्याबरोबरच कचेरी, स्टोअर, कँटिन, वगैरे अनुषंगिक इमारतीहि बांधण्यांत येतील. या ठिकाणीं रेल्वे साइडिंगची सोय करण्यांत आली आहे. हें काम तीन वर्षांत पुरें होईल, असा अंदाज आहे.

**भारतांत अधिक भांडवल गुंतवा** —ब्रिटनमधील असोशिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीजचे अध्यक्ष लॉर्ड चँडास भारताचा दौरा करून परत गेले. मायदेशीं परत गेल्यावर त्यांनीं ब्रिटनमधील उद्योगपतींना असा सल्ला दिला कीं भारताचें औद्योगीकरण होत असल्यामुळें व्यापारवृद्धीच्या ज्या नव्या संधी निर्माण होत आहेत त्यांचा फायदा घेऊन ब्रिटिश कारखानदारांनीं अधिक भांडवल भारतांत गुंतवावें.

**बड्या अधिकाऱ्याची बडतर्फी** —आयर्न अँड स्टील कंट्रोलरच्या कचेरींतील एका बड्या अधिकाऱ्याला लांचलुचपतीच्या गुन्ह्याबद्दल बडतर्फ करण्यांत आलें आहे. ह्या अधिकाऱ्याजवळ असलेली मालमत्ता त्याच्या वेतनाच्या मानानें फार आढळून आली व तीबद्दल त्याला योग्य असा खुलासा करतां आला नाहीं.

**रिहंड धरणाची व्याप्ति** —मध्य प्रदेशांतील रिहंड येथें बांधण्यांत येणाऱ्या धरणाचा जलविस्तार ४८८ चौरस मैल असेल. त्याखालीं १५,००० एकर शेतजमीन बुडून जाईल आणि ५१ खेड्यांतील लोकांना वसतीसाठी दुसरीकडे जावें लागेल. ज्या लोकांना जमिनीला व घरादारांना मुकावें लागेल त्यांची व्यवस्था दुसरीकडे करण्यांत येणार आहे.

**इंडोनेशिआच्या विद्यापीठाला देणगी** —जाकार्ता येथील इंडोनेशिआच्या विद्यापीठाला भारततर्फे कांहीं पुस्तकांची देणगी देण्यांत आली आहे. ह्या देणगींत इतिहास, कला, तत्त्वज्ञान, धर्म व संस्कृति ह्या विषयांवरील पुस्तकें आहेत. भारतीय संस्कृतीची अधिक चांगली ओळख व्हावी म्हणून ही देणगी देण्यांत आली आहे.


पुणें येथील लक्ष्मीरोडवरील बँकेच्या भव्य इमारतीचें

**दि. ७ रोजीं उद्घाटन झालें !**

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड, सातारा

शेड्यूल्ड बँक :: स्थापना : १९३६

हेड ऑफिस—चिरमुले-निकेतन, राजपथ, सातारा शहर.

शाखा—मुंबई, फोर्ट, गिरगांव, दादर, पुणें, नाशिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी, फलटण व अकलूज.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. सहा लक्ष पन्नास हजार |
| रिझर्व व इतर फंड | रु. चार लक्ष पंचाहत्तर हजार |
| ठेवी | रु. एक कोटि अठ्याऐंशी लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. दोन कोटि सतरा लक्ष |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

संचालक-मंडळ

श्री. शं. ह. साठे, चेअरमन.

श्री. रा. ना. गोडबोले	श्री. कृ. बा. खुटाळे	श्री. मु. प्र. दावके
श्री. गो. वि. पालकर	श्री. शि. वि. मोडक	श्री. य. रा. फडके

सि. ह. जोशी,
जनरल मॅनेजर.




## 'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

## कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: – श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.